28 JAN 2025
तरूण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जीवन प्रवासात राजाराम कॉलेजच्या संस्काराचा वाटा

## पद्मभूषण डॉ.शां.ब.मुजुमदार यांचे प्रतिपादन : डॉ. मुजुमदार यांना जीवन गौरव पुरस्कार

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

परदेशातल्या विद्यार्थ्यांना समस्या सोडविण्यासाठी सुरुवात करण्यात आलेल्या सिम्बॉयसीस या संस्थेने ५० वर्षात आंतरराष्ट्रीय विद्यापीठापर्यंतच्या जीवन प्रवासात राजाराम महाविद्यालयातून मिळवलेल्या संस्काराचा खूप मोठा वाटा आहे. मातृ संस्थेने जीवन गौरव पुरस्कार दिल्याने माझी जबाबदारी वाढलीच पण आनंदही झाला आहे, असे प्रतिपादन पद्मभूषण डॉ. शां. ब. मुजुमदार यांनी केले.

राजाराम कॉलेज शतकोत्तर सुवर्ण महोत्सवी वर्षाकडे वाटचाल करत आहे. त्याबद्दल आयोजित केलेल्या राजाराम महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी सिंबायोसिस विद्यापीठाची स्थापना करणाऱ्या डॉ. मुजुमदार यांना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते जीवन गौरव पुरस्कार देण्यात आला. याप्रसंगी ऑनलाईन ते बोलत होत्या. डॉ.



**कोल्हापूर : राजाराम कॉलेजमधील राजाराम महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी पद्मभूषण डॉ. शां. ब. मुजुमदार यांना जीवन गौरव पुरस्कार देवून गौरवण्यात आले. हा पुरस्कार कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते स्विकारताना डॉ. सतीश घाळी, कुलकर्णी. सोबत डॉ. बी. एम. हिर्डेकर, डॉ. धनराज नाकाडे, प्राचार्या डॉ. अनिता बोडके आदी.**

मुजुमदार यांच्यावतीने डॉ. सतीश घाळी व कुलकर्णी यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

डॉ. मुजुमदार म्हणाले, वनस्पतीशास्त्र विषय शिकवणाऱ्या शिक्षकांचे माझ्या यशात मोलाचे मार्गदर्शन लाभले. डॉ.परांडेकर, डॉ. कोकीळ, डॉ. मिश्रा यांच्याविषयी मी कृतज्ञता व्यक्त करतो. राजाराराम महाविद्यालयाने मला हा पुरस्कार देवून माझी जबाबदारी वाढवली आहे. विद्यार्थ्यांना परदेशी शिक्षणासाठी मार्गदर्शन करताना मला खूप आनंद होते. त्यांचे प्रश्न सोडवून त्यांना परदेशी शिक्षण देणे हेच माझे ध्येय असल्याचेही डॉ. मुजुमदार यांनी सांगितले.

राजाराम कॉलेजच्या प्राचार्या डॉ. अनिता बोडके यांनी प्रास्ताविकात महाविद्यालयाचा दैदिप्यमान इतिहास सांगितला. सद्यस्थितीत महाविद्यालयात ३५ विध्यार्थी संशोधन करत आहेत, असे सांगितले. डॉ रघुनाथ कडाकणे यांनी मानपत्राचे वाचन केले. सूत्रसंचालन डॉ. धनंजय देवळालकर यांनी केले. आभार डॉ. अश्विनी साळुंखे यांनी मानले. यावेळी उच्च व तंत्र शिक्षण कोल्हापूर विभागीय सहसंचालक डॉ. धनराज नाकाडे, डॉ. विश्वनाथ देशमुख, माजी प्राचार्य, डॉ. वसंत हेळवी, डॉ. अत्तार,डॉ. राजकुमार कांबळे, आजी-माजी विद्यार्थी, कर्मचारी, आदी उपस्थित होते.

28 JAN 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'राजाराम'चा जीवनगौरव माझ्यासाठी खूप मोलाचा

## डॉ. शां. ब. मुजूमदार : राजाराम महाविद्यालयाच्या वतीने सन्मान



कोल्हापूर : राजाराम महाविद्यालयातर्फे पद्मभूषण डॉ. शां. ब. मुजूमदार यांना जीवनगौरव पुरस्कार जाहीर करण्यात आला. त्यांच्या वतीने डॉ. सतीश घाळी व मकरंद कुलकर्णी यांनी तो कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते स्वीकारला. यावेळी डॉ. बी. एम. हिर्डेकर, डॉ. धनराज नाकाडे, प्राचार्या डॉ. अनिता बोडके, डॉ. विश्वनाथ देशमुख.

कोल्हापूर, ता. २७ : 'हा माझ्या आयुष्यातील विशेष दिवस आहे. या महाविद्यालयातून मी विज्ञान शाखेचा पदवीधर झालो. डॉ. परांडेकर, डॉ. कोकीळ व डॉ. मिश्रा यांनी या काळात केलेले मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले. पुढे फर्ग्युसन महाविद्यालयात रेक्टर म्हणून काम करताना माझ्या आयुष्याला टर्निंग पॉईंट मिळाला. 'वसुधैव कुटुंबकम्' या भावनेतून परदेशी विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी डोक्यात विचार सुरू झाले आणि ते प्रत्यक्षात आणले. आज मी करत असलेल्या कार्याबद्दल मी ज्या महाविद्यालयात घडलो, त्या महाविद्यालयाने दिलेला जीवनगौरव पुरस्कार माझ्यासाठी खूप मोलाचा आहे,' अशा भावना सिंबायोसिसचे संस्थापक डॉ. शां. ब. मुजूमदार यांनी व्यक्त केल्या. त्यांनी दृकश्राव्य माध्यमाद्वारे उपस्थितांशी संवाद साधला.

राजाराम महाविद्यालयात आयोजित राजाराम महोत्सवात डॉ. मुजूमदार यांना जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते डॉ. मुजूमदार यांच्या वतीने डॉ. सतीश घाळी व मकरंद कुलकर्णी यांनी पुरस्कार स्वीकारला. यशवंतराव चव्हाण सभागृहात हा कार्यक्रम झाला.

शिवाजी विद्यापीठाचे माजी परीक्षा नियंत्रक डॉ. बी. एम. हिर्डेकर यांचे यावेळी 'उच्च शिक्षणातील समस्या व उपाय' या विषयावर व्याख्यान झाले. ते म्हणाले, 'विद्यार्थ्यांनो, नवी कौशल्ये आत्मसात कराल तरच स्पर्धेत टिकाल. पाश्चिमात्य देशातील शिक्षण व्यवसायाभिमुख आहे. तेथील पालक मुलाच्या वयाच्या अठरा वर्षांनंतर त्याला स्वतःच्या पायावर उभे राहण्याची संधी निर्माण करतात. परिणामी, तेथील शिक्षण मुलांना कार्यप्रवण ठेवणारे आहे. भारतातील शिक्षणाबाबत सांगायचे, तर काळानुरूप विद्यार्थ्यांनी स्वतःमध्ये बदल करावेत. नवीन कौशल्ये अंगीकारावीत. बहुआयामी बनून संवाद कौशल्य विकसित करावे.'

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'राजाराम महाविद्यालयाचे शैक्षणिक प्रगतीत महत्त्वाचे योगदान राहिले आहे. जगाच्या कानाकोपऱ्यात महाविद्यालयाचे विद्यार्थी आहेत. दिवंगत संरक्षणमंत्री यशवंतराव चव्हाण, खाशाबा जाधव हे याच महाविद्यालयाचे विद्यार्थी होते. इथले विद्यार्थी प्रत्येक क्षेत्रात चमकलेले आहेत. महाविद्यालयाचे तत्कालीन प्राचार्य डॉ. बाळकृष्ण यांची शिवाजी विद्यापीठ उभारावे, ही इच्छा होती. ती पूर्णत्त्वास येऊन आज घडीला लाखो विद्यार्थी विद्यापीठासह संलग्नित महाविद्यालयांतून शिक्षण घेत आहेत.'

प्राचार्या डॉ. अनिता बोडके यांनी महाविद्यालयाच्या वाटचालीचा आढावा घेतला. यावेळी उच्च शिक्षण विभागाचे सहसंचालक धनराज नाकाडे, डॉ. विश्वनाथ देशमुख, माजी प्राचार्य डॉ. वसंत हेळवी, डॉ. यास्मिन अत्तार, डॉ. राजकुमार कांबळे उपस्थित होते. डॉ. धनंजय देवळाणकर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. साळुंखे यांनी आभार मानले.

28 JAN 2025

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात ७६व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्यासह वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत ध्वजवंदन करण्यात आले.

## शिवाजी विद्यापीठ

प्रजासत्ताक दिनानिमित्त कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते आणि प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत ध्वजारोहण करण्यात आले. राष्ट्रीय छात्र सेनेच्या (एनसीसी) छात्रांनी ध्वजास सलामी दिली. राष्ट्रगीतासह महाराष्ट्र गीत आणि विद्यापीठ गीताचे सामूहिक गायन करण्यात आले. त्यानंतर मान्यवरांनी विद्यापीठ प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भव्य अश्वारुढ पुतळ्यास पुष्प वाहून अभिवादन केले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. सरिता ठकार, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. धनंजय सुतार, डॉ. शरद बनसोडे, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. सागर डेळेकर, सिद्धार्थ शिंदे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 JAN 2025
लोकमत



विद्यापीठात प्रजासत्ताक दिनानिमित्त कुलगुरू डॉ. शिर्के यांच्याहस्ते ध्वजवंदन झाले.

# शिवाजी विद्यापीठात ध्वजवंदन

**कोल्हापूर :** प्रजासत्ताक दिन शिवाजी विद्यापीठात उत्साहात साजरा केला.


कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत सकाळी आठ वाजता ध्वजवंदन केले. राष्ट्रीय छात्र सेनेच्या (एनसीसी) छात्रांनी ध्वजास सलामी दिली. यावेळी राष्ट्रगीतासह महाराष्ट्र गीत आणि विद्यापीठ गीताचे सामूहिक गायन केले. मान्यवरांनी विद्यापीठ प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भव्य अश्वारूढ पुतळ्यास पुष्प वाहून अभिवादन केले.

यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एल. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. सरिता ठकार, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, डॉ. तानाजी चौगुले उपस्थित होते.

'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' पुस्तक परीक्षण स्पर्धेत वनस्पतीशास्त्र अधिविभागाच्या अभिषेक लाडे याने प्रथम, तर शुभम मोहन जाधव (ग्रंथालय व माहितीशास्त्र अधिविभाग) आणि रोहित रामचंद्र भांगे (शिक्षणशास्त्र अधिविभाग) यांनी अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावले. त्यांना कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते पारितोषिके देऊन गौरविले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 JAN 2025

पुण्यनगरी



कोल्हापूर : कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्यासह वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत ध्वजवंदन करण्यात आले.

## शिवाजी विद्यापीठ

**कोल्हापूर :** भारतीय प्रजासत्ताक दिन रविवारी शिवाजी विद्यापीठात उत्साहात साजरा करण्यात आला. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत ध्वजवंदन करण्यात आले. राष्ट्रीय छात्रसेनेच्या (एनसीसी) छात्रांनी ध्वजास सलामी दिली. यावेळी कुलसचिव विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक अजितसिंह जाधव, सुहासिनी पाटील, सरिता ठकार, श्रीकृष्ण महाजन, महादेव देशमुख, तानाजी चौगुले, धनंजय सुतार, शरद बनसोडे, रामचंद्र पवार, सागर डेळेकर, सिद्धार्थ शिंदे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 JAN 2025
सकाळ

# शिवाजी विद्यापीठ

शिवाजी विद्यापीठात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते आणि प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत ध्वजवंदन करण्यात आले. राष्ट्रीय छात्रसेनेच्या छात्रांनी ध्वजास सलामी दिली. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारुढ पुतळ्यास अभिवादन करण्यात आले. 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या पंधरवडाअंतर्गत पुस्तक वाचन करून त्याचे परीक्षण करण्याची स्पर्धा अधिविभागीय स्तरावर घेण्यात आली. त्यात वनस्पतीशास्त्र अधिविभागाच्या अभिषेक लाडे याने प्रथम, तर शुभम जाधव (ग्रंथालय व माहितीशास्त्र अधिविभाग), रोहित भांगे (शिक्षणशास्त्र अधिविभाग) यांनी अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावले. त्यांना कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते गौरविण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, अधिष्ठाता डॉ. सरिता ठकार, श्रीकृष्ण महाजन, महादेव देशमुख, तानाजी चौगुले, धनंजय सुतार, शरद बनसोडे, रामचंद्र पवार, सागर डेळेकर, सिद्धार्थ शिंदे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 JAN 2025
पुढारी

# विद्यापीठात आज 'विकसित भारतासाठी सामाजिक समावेशन' विषयावर परिषद

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या सामाजिक समावेशन अभ्यास केंद्राच्या वतीने मंगळवार (दि. २८) रोजी 'विकसित भारतासाठी सामाजिक समावेशन' या विषयावर राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. परिषदेचे उद्घाटन मुंबई विद्यापीठातील निवृत्त प्रा. डॉ. रमेश कांबळे यांच्या बीजभाषणाने होणार आहे. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के असतील. पहिल्या सत्रात 'आरोग्य आणि समाज कल्याण' या विषयावर डॉ. योगेश साळी व डॉ. रवींद्र श्रावस्ती व दुसऱ्या सत्रात 'आर्थिक सक्षमीकरण आणि सामाजिक नवकल्पना' या विषयावर प्रा. प्रशांत बनसोडे तर तिसऱ्या सत्रात 'जात, लिंग आणि सामाजिक न्याय' या विषयावर डॉ. सुनीता सावरकर मांडणी करतील. परिषदेच्या शेवटी 'बलुतं' चित्रपट दाखविण्यात येईल. त्यावरील चर्चेत चित्रपट समीक्षक डॉ. अनमोल कोठडिया सहभागी होतील. परिषदेमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे व केंद्राचे संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 JAN 2025
तरुण भारत



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित परिसंवादात बोलताना डॉ. सुनीता सावरकर. सोबत अविनाश भाले, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. दीपा श्रावस्ती, डॉ. रणधीर शिंदे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची चळवळ मानवतेसाठी

- डॉ. सुनिता सावरकर यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी
कोल्हापूर

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सुरू केलेली चळवळ कोणत्याही विशिष्ट जात किंवा समुदायापुरती मर्यादित नव्हती, तर ती मानवी हक्क प्रस्थापित करणाऱ्या लोकांची मानवतेसाठीची चळवळ होती, असे प्रतिपादन डॉ. सुनिता सावरकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या 'बहिष्कृत हितकारिणी सभा' या संस्थेच्या शतकपूर्तीनिमित्त 'ढोर-चांभार स्त्रियांच्या आंबेडकरी जाणिवांचा परीघ' पुस्तकावरील परिसंवादामध्ये त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी डॉ. श्रीकृष्ण महाजन होते. डॉ.सुनिता सावरकर लिखित या पुस्तकावरील परिसंवादात लेखिका डॉ. सावरकर यांच्यासह डॉ. रणधीर शिंदे, डॉ. दीपा श्रावस्ती सहभागी झाले.

डॉ. सावरकर म्हणाल्या, इतिहास हा फक्त एका समूहाचा नसतो, तर त्या काळामध्ये अस्तित्वात असणाऱ्या अनेक समूहांचा असतो.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 JAN 2025
सकाळ

# डॉ. आंबेडकर यांची चळवळ मानवतेसाठी

## डॉ. सुनीता सावरकर : विद्यापीठात परिसंवाद



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित परिसंवादात बोलताना लेखिका डॉ. सुनीता सावरकर.

कोल्हापूर, ता. २७ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सुरू केलेली चळवळ कोणत्याही विशिष्ट जात किंवा समुदायापुरती मर्यादित नव्हती, तर ती मानवी हक्क प्रस्थापित करणाऱ्या लोकांची मानवतेसाठीची चळवळ होती, असे प्रतिपादन लेखिका डॉ. सुनीता सावरकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्रातर्फे 'बहिष्कृत हितकारिणी सभा' या संस्थेच्या शतकपूर्तीनिमित्त 'ढोर-चांभार स्त्रियांच्या आंबेडकरी जाणिवांचा परीघ' पुस्तकावरील परिसंवादामध्ये त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन होते. डॉ. महाजन म्हणाले, 'डॉ. सावरकर यांचे पुस्तक जातींची धारदार होत चाललेली टोके मोडण्यासाठी महत्त्वपूर्ण आहे. त्यात आंबेडकरी चळवळीचे भान आणि जाणिवा जागृत झालेल्या स्त्रियांच्या कार्याची नोंद घेतली आहे.' डॉ. रणधीर शिंदे, डॉ. दीपा श्रावस्ती यांनी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमास सुरेश शिपूरकर, डॉ. प्रकाश कांबळे, अवनीश पाटील, जयवंत व्हटकर, मधुकर शिर्के, चंद्रकांत शिर्के, मदन पवार, किरण गवळी उपस्थित होते. अविनाश भाले यांनी प्रास्ताविक केले. तेजपाल मोहरेकर यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 JAN 2025

सकाळ

# प्रबोधन करणाऱ्या संस्थांनी संविधानासाठी एकत्र यावे

## वाघमारे : विद्यापीठात भारतीय जनसंविधान मंच अभियान

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २७ : जनसामान्यांचे कल्याण हे संविधानामध्ये आहे. त्यामुळे समाजात प्रबोधनाचे काम करणाऱ्या संस्था, संघटनांनी संविधानासाठी एकत्र यावे, असे आवाहन विधानभवनातील निवृत्त माहिती व संशोधन अधिकारी बाबासाहेब वाघमारे यांनी येथे केले.

शिवाजी विद्यापीठातील राज्यशास्त्र अधिविभाग, भारतीय जनसंविधान मंच आणि चांगुलपणाची चळवळतर्फे आयोजित मानवव्यशास्त्र सभागृहात 'भारतीय जन संविधान मंच अभियान' या उपक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ राजकीय विश्लेषक डॉ. किशोर बेडकीहाळ होते. राज्यशास्त्र अधिविभाग प्रमुख प्रा. डॉ. प्रकाश पवार प्रमुख उपस्थित होते.

डॉ. बेडकीहाळ म्हणाले, 'प्रत्येकाने संविधान स्वतःमध्ये मुरवून घेतले पाहिजे. संविधानाची मूल्ये दैनंदिन व्यवहारासह आचारणातून प्रकट झाली पाहिजेत. भारतीय स्वातंत्र्य चळवळीतून संविधानिक मूल्ये पुढे आली आहेत.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात सोमवारी भारतीय जनसंविधान मंच अभियानाच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना बाबासाहेब वाघमारे.

राजकीय समानता घटनेने दिली आहे. घटना साध्य आणि साधन आहे.'

नारायण पोवार, बाजीराव नाईक यांनी मनोगत व्यक्त केले. प्रा. डॉ. पवार यांनी या उपक्रमातील सहभागामागील भूमिका सांगितली. भारतीय जन संविधान मंचचे संस्थापक पारस ओसवाल यांनी प्रास्ताविक केले. त्यांनी या मंच आणि अभियानांतर्गत राबविल्या जाणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली. वाचनकट्टा संस्थेचे अध्यक्ष युवराज कदम यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. निशा वाडेकर यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 JAN 2025
पुढारी

# सुप्रशासन कार्यशाळांची आवश्यकता : डॉ. शिंदे

**कोल्हापूर :** काळानुरूप होणारे बदल जाणण्यासाठी कार्यालयीन पत्रव्यवहार, सुप्रशासन कार्यशाळांची आवश्यकता आहे, असे प्रतिपादन विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले. सायबर ट्रस्ट संचलित कॉलेज ऑफ नॉन-कन्व्हेंशनल व्होकेशनल कोर्सेस फॉर वूमेन, कोल्हापूर येथे शिवाजी विद्यापीठ अग्रणी महाविद्यालय योजनेंतर्गत कार्यालयीन पत्रव्यवहार व सुप्रशासन या विषयावर कार्यशाळेत ते बोलत होते. यावेळी प्राचार्य प्रो. डॉ. आर. जी. कुलकर्णी, गजानन पळसे, डॉ. एस एम कुबल, सहा. प्रा. रितिका चंदवाणी यांनी मार्गदर्शन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 JAN 2025

तरुण भारत

# गुरु, शुक्र, मंगळ पाहण्याची विद्यार्थ्यांना मिळाली पर्वणी

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीवरून संशोधक विद्यार्थी तसेच नागरिकांना गुरु, शुक्र, मंगळ ग्रह पाहण्याची अनोखी पर्वणी सोमवारी रात्री मिळाली. विद्यापीठात अवकाश संशोधन केंद्राने आकाश निरीक्षण कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमात विद्यार्थी आणि नागरिकांनी १२ इंची दुर्बिणीच्या साह्याने शनी, गुरू, शुक्र ग्रह तसेच चंद्र पृष्ठभाग, निबुला, अकाक्षगांगा आदींचे निरीक्षण केले.

कार्यक्रमात तज्ज्ञांनी उपस्थितांना अवकाशविज्ञानाविषयी मार्गदर्शन केले. तसेच, विविध खगोलीय घटनांबद्दल माहिती दिली. यावेळी मोठ्या संख्येने शालेय विद्यार्थी, नागरिक यांच्यासह अवकाश संशोधन केंद्राचे संचालक डॉ.राजीव व्हटकर, डॉ. निलेश तरवाळ, संशोधक विद्यार्थी नागेश कोठावळे, राजवर्धन करळे, सहभागी झाले होते.

अशा प्रकारचे कार्यक्रम नियमितपणे आयोजित करून शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थी आणि नागरिकांमध्ये अवकाश विज्ञानाची जाणीव जागृत करण्याचा प्रयत्न करत आहे, असे या केंद्राचे समन्वयक डॉ. व्हटकर सांगितले.



कोल्हापूर : आकाशातील ग्रहांचे निरीक्षण करताना विद्यार्थी.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 JAN 2025
सकाळ

# विद्यापीठात आज प्रत्यक्ष निसर्गचित्रण

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागातर्फे मंगळवारी (ता. २८) सकाळी आठ वाजता राज्यस्तरीय प्रत्यक्ष निर्सगचित्रण स्पर्धा होणार आहेत. या स्पर्धेचे उद्‌घाटन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते होईल. सायंकाळी पाच वाजता प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते स्पर्धेचे बक्षीस होणार असल्याची माहिती संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाचे प्रभारी प्रमुख डॉ. विनोद ठाकूर-देसाई यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 JAN 2025
तरुण भारत

# विद्यापीठात आज निसर्गचित्र स्पर्धा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या वतीने राज्यस्तरीय प्रत्यक्ष निसर्ग चित्रण स्पर्धा होणार आहेत. या स्पर्धेचे उद्घाटन आज (दि. २८) रोजी सकाळी ८ वाजता कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते होणार आहे. अधिविभागात होणाऱ्या या स्पर्धेत चित्रकारांनी सहभागी व्हावे, असे आवाहन अधिविभागप्रमुख डॉ. विनोद ठाकूरदेसाई यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 JAN 2025
सकाळ

# 'विकसित भारतासाठी सामाजिक समावेशन'वर आज परिषद

कोल्हापूर, ता. २७ : शिवाजी विद्यापीठाच्या सामाजिक समावेशन अभ्यास केंद्रातर्फे मंगळवारी (ता.२८) 'विकसित भारतासाठी सामाजिक समावेशन' या विषयावर राष्ट्रीय परिषद होणार आहे. या परिषदेचे उद्घाटन मुंबई विद्यापीठातील निवृत्त प्राध्यापक डॉ. रमेश कांबळे यांच्या बीजभाषणाने होणार असून, अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के असतील. या परिषदेच्या पहिल्या सत्रात 'आरोग्य आणि समाज कल्याण' या विषयावर डॉ. योगेश साळी, रवींद्र श्रावस्ती, दुसऱ्या सत्रात 'आर्थिक सक्षमीकरण आणि सामाजिक नवकल्पना' या विषयावर प्रा. प्रशांत बनसोडे, तर तिसऱ्या सत्रात 'जात, लिंग आणि सामाजिक न्याय' या विषयावर डॉ. सुनीता सावरकर मांडणी करतील. परिषदेच्या शेवटी 'बलुतं' चित्रपट दाखविण्यात येईल. त्यावरील चर्चेत चित्रपट समीक्षक डॉ. अनमोल कोठडिया सहभागी होतील, अशी माहिती कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 JAN 2025
सकाळ



मुंबई : सामंजस्य करारावेळी डॉ. विलास कारजिन्नी, एफ. एच. एम. युनिव्हर्सिटीचे कुलगुरू प्रो. डॉ. वोलकर विटरबर्ग, डॉ. एस. एम. पिसे, आदी.

# वारणा विद्यापीठाचा एफएचएम जर्मनी विद्यापीठाशी सामंजस्य करार

वारणानगर, ता. २७ : वारणा विद्यापीठ व एफ.एच.एम. युनिव्हर्सिटी ऑफ अप्लायड सायन्सेस जर्मनी यांच्यात सामंजस्य करार झाला.

करारावर वारणा विद्यापीठाकडून वारणा विभाग शिक्षण मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. विलास व्ही. कारजिन्नी व एफ.एच.एम. युनिव्हर्सिटीचे कुलगुरू प्रो. डॉ. वोलकर विटरबर्ग यांनी स्वाक्षरी केल्या. करारावेळी तात्यासाहेब कोरे अभियांत्रिकी महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. एस. एम. पिसे उपस्थित होते. हा करार हॉटेल सोफिटेल, मुंबई बीकेसी येथे झाला.

एफएचएम युनिव्हर्सिटी ऑफ अप्लाइड सायन्स जगविख्यात जर्मन कंपनी सिमेन्स यांच्या सहकार्यातून स्थापित झालेले ख्यातनाम विद्यापीठ असून जर्मनीमध्ये दहा कॅम्पस आहेत. करारासाठी कोल्हापूर महालक्ष्मी ॲकॅडमीचे संचालक, अभय केळकर, तात्यासाहेब कोरे अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. टी. साळोखे यांचे सहकार्य लाभले. एफएचएम विद्यापीठाच्या कुलगुरू प्रो. डॉ. वोलकर विटरबर्ग यांनी मार्चमध्ये वारणा विद्यापीठाला भेट देण्याचे आश्वासन दिले. करार यशस्वीतेबद्दल वारणा शिक्षण मंडळाचे अध्यक्ष डॉ. विनय कोरे यांनी शुभेच्छा दिल्या. सामंजस्य करारामुळे मेकॅनिकल, एन्व्हायरमेंटल, डेटा सायन्स, सायबर सिक्युरिटी, ऑटोमोबाईल मोबिलिटी, एमबीए असे अनेक अभ्यासक्रम विद्यार्थ्यांसाठी इंग्रजी भाषेत उपलब्ध होणार असून, अभ्यासक्रमानंतर विद्यार्थ्यांना जर्मनीबरोबरच संपूर्ण युरोपमध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील, अशी माहिती डॉ. कारजिन्नी यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 JAN 2025
सकाळ

# शारमीन मुजावर यांना पीएच.डी.


शारमीन मुजावर

**शिरोली पुलाची :** येथील कु. शारमीन इब्राहीम मुजावर यांना शिवाजी विद्यापीठाकडून रसायनशास्त्र विषयातील पीएच.डी. पदवी मिळाली. त्यांनी रसायनशास्त्र या विषयात - 'अे. कंपॅरिटिव्ह मेकॅनिस्टिक इनव्हेस्टिगेशन ऑफ रिॲक्शनस ऑफ ट्रान्झिशन मेटल ऑक्सिडंटस् वुईथ देअर हेटरो पॉलिऑक्झो- मेटॅलेट साल्टस्' या विषयावर संशोधन केले. त्यांना मिरज महाविद्यालयाचे रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ. आर. एस. यलगुद्रे व शिवाजी विद्यापीठ रसायन विभागाचे माजी विभागप्रमुख डॉ. जी. एस. गोकावी यांचे मार्गदर्शन लाभले. शिवाजी विद्यापीठ रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ. के. डी. सोनवणे यांनी अभिनंदन केले.